साप्ताहिक
# विश्वनायक
Email: vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख • VISHVANAYAK Mo.8686888898




■ बीड (महाराष्ट्र) ■ साप्ताहिक ■ द्विभाषिक ■ वर्ष - ०१ ■ अंक - ०२ ■ मंगळवार दि.०६ जानेवारी २०२६ ■ पीआरजीआय रजि.नं.- एमएएचबीआयएल/२५/ए४९८० ■ किंमत २ रू. ■ पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Weekly ■ BILINGUAL ■ Year - 01 ■ Issue - 02 ■ Tuesday Dt. 06 January 2026 ■ PRGI.REG.No. MHBIL/25/A4980 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4

# महावितरणमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून भ्रष्टाचार दाबण्याचा प्रयत्न!

## अधिकारी -कर्मचारी यांनी केलेली चोरी पुराव्यासह समोर आली मात्र तरीसुद्धा दिशाभूल

**बीड । विश्वनायक न्यूज**


भ्रष्टाचाराने पोखरलेल्या बीड महावितरण प्रशासनाचा खरा चेहरा पुन्हा एकदा जनतेसमोर आला असून, ११ केव्ही विद्युत लाईनच्या साहित्य चोरी प्रकरणात थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांनीच पोलिसांची दिशाभूल केल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. शासकीय मालमत्तेवर डल्ला मारणाऱ्यांना वाचवण्यासाठी महावितरणमध्ये संघटित 'रॅकेट' कार्यरत असल्याचा संशय आता बळावला आहे. महावितरण मध्ये चोरी करणारे अधिकारी आणि त्यांना वाचविण्याचा आटापिटा करणारे वरिष्ठ अधिकारी या सगळ्यांची चौकशी लावून त्यांच्यावर त्यांनी केलेल्या गुन्ह्याप्रमाणे लातूर विभागाचे मुख्य अभियंता श्री बुलबुले हे कारवाई करणार का? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

## कार्यकारी अभियंता डोंगरे यांनी पोलिसांना दिली चुकीची माहिती

## लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता बुलबुले त्यांच्याकडून न्यायाची अपेक्षा

इदगाह सबस्टेशन ते खासबाग दरम्यानची ११ केव्ही विद्युत लाईन वरिष्ठांच्या लेखी परवानगीशिवाय काढून टाकण्यात आली. हे मौल्यवान साहित्य महावितरणच्या भंडारात जमा न होता थेट गायब झाले. म्हणजेच हा सरळसरळ शासकीय मालाचा अपहार असल्याचे स्पष्ट आहे.या गंभीर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राहुल जायभाये यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने ५ जानेवारी २०२४ रोजी सादर केलेल्या अहवालात सहाय्यक अभियंता प्रदीप मिसाळ, उमेश कसबे आणि जयहिंद एम्पायर (खासगी कंत्राटदार) यांनी संगनमताने लाईन काढल्याचा ठपका स्पष्टपणे







ठेवला आहे.

इतके ठोस पुरावे असतानाही दोषींवर फौजदारी कारवाई करण्याऐवजी अधीक्षक अभियंत्यांनी केवळ वेतनवाढ रोखण्यासारखी तुटपुंजी शिक्षा देत प्रकरण थंड बस्त्यात घालण्याचा प्रयत्न केला. याहूनही धक्कादायक म्हणजे, याच प्रकरणात पोलिसांना चुकीची माहिती देण्यात आल्याचे आता समोर येत आहे. महावितरणच्या बीड विभागातील हा प्रकार म्हणजे भ्रष्टाचाराच्या दलदलीत अडकलेला संपूर्ण विभाग उघडा पडला आहे. या प्रकरणानंतर आता सर्वसामान्य नागरिकांच्या नजरा मुख्य अभियंता बुलबुले साहेब यांच्याकडे लागल्या आहेत. आता तरी हे भ्रष्ट रॅकेट ठेचून काढणार का, की दोषींना पाठीशी घालण्याची परंपरा कायम राहणार? असा थेट आणि संतप्त सवाल जनता विचारत आहे. महावितरण मधील कारभार भोंगळ स्वरूपात चालतो हे अनेक उदाहरणावरून स्पष्ट झाले आहे. महावितरण ची अख्खी लाईन विकून खाल्ली जाते. याची पुराव्यासह तक्रार दाखल होते मात्र तरीसुद्धा वरिष्ठ अधिकारी कसलीच कार्यवाही करीत नाहीत. पुन्हा पुन्हा तक्रार केली तरी उत्तर देत नाहीत. एवढेच नाही तर या प्रकरणासाठी नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल आला तरी त्यावर योग्य ती कारवाई करीत नाही असे दिसून आले आहे. त्यानंतर कोर्टाचा आदेश आला तरीसुद्धा हे अधिकारी त्यालाही जुमानत नाहीत. जेव्हा याबाबत काय कारवाई केली असे विचारले गेले त्यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अत्यंत हास्यस्पद आणि लज्जास्पद उत्तर दिले आहे. एवढा मोठा गंभीर गुन्हा असतानाही संबंधित अधिकाऱ्यांवर केवळ शिस्तभंगाची कारवाई केली असल्याचे त्यांनी सांगितले. एरवी सामान्य लोकांवर थेट गुन्हा दाखल करायला येणारे महावितरणचे अधिकारी स्वतःच्या अधिकाऱ्याला मात्र पांघरून घालत असल्याचे यावरून स्पष्ट दिसून आले. आता विभागीय अधिकारी यावर काय निर्णय घेतात याकडे लक्ष लागले आहे.

### लातूरचे मुख्य अभियंता बुलबुले यांच्याकडून कार्यवाहीची अपेक्षा

बीडच्या महावितरण मधील अधिकाऱ्यांनी आणि कर्मचारी सोबतच गुत्तेताराने केलेला भ्रष्टाचार पुराव्यासह चव्हाट्यावर आला आहे. नेमलेल्या चौकशी समितीने ही ते मान्य केले आहे. सोबतच औरंगाबादच्या खंडपीठानेही कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. मात्र स्थानिक वरिष्ठ अधिकारी हे खालच्या अधिकाऱ्यांना आणि गुत्तेदाराला वाचविण्यात मग्न असल्याचे दिसते. याबाबत लातूर येथील मुख्य अभियंता बुलबुले यांना याबाबतची सगळी माहिती देण्यात आली आहे. त्यांनी तक्रार सोबतच हायकोर्टाचा आदेश आणि इतर बाबी तपासल्या आहेत. त्यांनी पुढील कार्यवाही करण्याचे आदेश सुद्धा संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत मात्र अधिकारी आता हे प्रकरण किती गांभीर्याने घेतात हे पहावे लागणार आहे. जर अधिकाऱ्यांनी कारवाई केली नाही तर श्री बुलबुले यांनी आपण यात लक्ष घालून संपूर्ण चौकशी करू असे आश्वासन दिले आहे त्यामुळे त्यांच्या भूमिकेवरच सर्व काही अवलंबून आहे.

### हायकोर्टातून पोलिसांना आदेश मात्र स्थानिक अधिकाऱ्यांची चुकीची माहिती...

अख्खी लाईन चोरीचे हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर याबाबत तक्रारदार शेख बिलाल यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली. यावर चौकशी अहवाल बसविण्यात आला. यामधून तक्रारीत तथ्य असल्याचे समोर आले. मात्र तरीसुद्धा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचारी अधिकाऱ्याला पाठीशी घालताना त्यावर कसलीच कारवाई केली नाही. याबाबत वारंवार तक्रारी केल्या मात्र याची दखल घेतली गेली नाही. यानंतर तक्रारदार बिलाल हे थेट औरंगाबादच्या हाय कोर्टात गेले. त्या ठिकाणी सुनावणी झाल्यानंतर हायकोर्टाने आदेश काढून, पोलिसांना कारवाईचे आदेश दिले. यानुसार तक्रारदार शेख बिलाल यांनी बीड पोलिसात धाव घेतली. पोलिसांनी प्रकरण नोंदवून घेतले आणि बीडच्या महावितरण कार्यालयात याची चौकशी केली. यावेळी त्या ठिकाणी कार्यरत असलेले कार्यकारी अभियंता श्री डोंगरे यांनी पोलिसांना चुकीची माहिती देत अशी कुठलीही चोरीच झाली नसल्याचे लिहून दिले. यामुळे पोलिसांची पुढील कार्यवाही झाली नाही. महावितरण कडून स्थापन केलेल्या चौकशी समितीने विरोधात अहवाल दिला असतानाही डोंगरे यांनी चुकीची माहिती पोलिसांना दिली. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी होण्याची गरज आहे. डोंगरे यांनी चुकीची माहिती का दिली ? त्यांच्यावर कोणाचा दबाव होता का ? ते कुठल्या आमिषाला बळी पडले का ? या सर्व बाबी तपासण्याची गरज आहे.

# एमपीडीए कायद्यांतर्गत माजलगावातील सराईत गुन्हेगाराची हर्सल कारागृहात रवानगी

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी कठोर उपाययोजना राबवण्यास सुरुवात केली असून, जिल्ह्यातील गुडगिरीचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने चझऊ- (महाराष्ट्र घोकादायक क्रियाकलाप प्रतिबंधक) कायद्यांतर्गत सराईत गुन्हेगारांवर कारवाई करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस ठाणे माजलगाव शहरचे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांनी इसम नामे भगवान कटाळू मेंडके (वय ५२), रा. शिवाजीनगर, माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड यास चझऊ- कायद्यांतर्गत स्थानबद्ध करण्याचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक, बीड यांच्यामार्फत मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, बीड यांच्याकडे सादर केला होता. सदरइ समाविरुद्ध पोलीस ठाणे माजलगाव शहर येथे गावठी हातभट्टीची दारू तयार करणे, गावठी दारूची चोरटी विक्री करणे, दंडाधिकाऱ्यांच्या आदेशांचे उल्लंघन करणे, अशा स्वरूपाचे एकूण १० दखलपात्र व गंभीर गुन्हे नोंद असल्याने तो परिसरात दहशत निर्माण करत होता. त्यामुळे त्याच्यावर पोलीस प्रशासनाची सातत्याने करडी नजर होती.

या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी बीड श्री. विवेक जॉन्सन यांनी आदेश क्र. २०२५/आरबी-डेस्क-१/पोल-१/एमपीडीए-२८, दिनांक ३१/१२/२०२५ अन्वये भगवान कटाळू मेंडके यास चझऊ- कायद्यांतर्गत एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याचे आदेश पारित केले. त्यानुसार पोलीस अधीक्षक बीड यांच्या आदेशान्वये, गोपनीय बातमीदारांच्या ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. ऋषिकेश शिंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. शैलेश गायकवाड व श्री. अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, सपोनि प्रल्हाद मुंढे, पोह/अभिमन्यु औताडे (स्थागुशा बीड), तसेच पोलीस ठाणे माजलगाव शहरचे पोह/गणेश नांगरे, पोकों/महादेव बहिरवाळ, पोकों/संतराम थापडे, पोकों/अंगद घोडके व पोकों/नितीन नवले यांनी यशस्वीरीत्या पार पाडली. भविष्यातही गुंडगिरी करणाऱ्या व कायद्याला न जुमानणाऱ्या व्यक्तीविरुद्ध चझऊ- कायद्यांतर्गत कठोर प्रतिबंधात्मक कारवाई सुरूच राहील, असे स्पष्ट संकेत पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी दिले आहेत.

मदतीने दि.३१/१२/२०२५ रोजी सदर इसमास त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेऊन योग्य पोलीस बंदोबस्तात हर्सल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे दाखल करण्यात आले. सन २०२५ मध्ये चझऊ- अंतर्गत स्थानबद्ध गुन्हेगार पोलीस ठाणे माजलगाव शहर हद्दीत सन २०२५ मध्ये खालील सराईत गुन्हेगारांना चझऊ- कायद्यांतर्गत हर्सल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले आहे-१. तारेख मुसा खान (वय २८), रा. फुलेनगर, माजलगाव २. नारायण रावसाहेब करपे (वय ४५), रा. शिवाजीनगर, माजलगाव ३. शाम आप्पाराव भालेकर (वय ३८), रा. अशोकनगर, माजलगाव ४. भगवान कटाळू मेंडके (वय ५२), रा. शिवाजीनगर, माजलगाव.

# माजलगावात छत्तीसगडमधील दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार

**माजलगाव । प्रतिनिधी**

पोटाची खळगी भरण्यासाठी छत्तीसगड राज्यातून बीड जिल्ह्यात ऊसतोडणीसाठी आलेल्या दोन आदिवासी अल्पवयीन मुलींवर गावातीलच दोघांनी अत्याचार केल्याची संतापजनक घटना माजलगाव तालुक्यातील रोशनपुरी येथे घडली आहे. या घृणास्पद प्रकाराने जिल्हा हादरला असून, माजलगाव ग्रामीण पोलिसांनी तातडीने कारवाई करत किराणा दुकानदार आणि ट्रॅक्टर चालक असलेल्या दोन नराधमांना बेड्या ठोकल्या आहेत. गणेश राजाभाऊ घाटूळ (किराणा दुकानदार) आणि अशोक भास्कर पवार (ट्रॅक्टर चालक) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

बीड जिल्ह्यात यंदा परराज्यातून मोठ्या प्रमाणावर ऊसतोड मजूर आले आहेत. दोन महिन्यांपूर्वी मुकादम उद्धव श्रीकिशन तिडके यांच्या माध्यमातून छत्तीसगड राज्यातील १४ मजुरांची एक टोळी माजलगाव तालुक्यात ऊसतोडणीसाठी आली होती. रोशनपुरी शिवारात त्यांचे काम सुरू होते. स्वयंपाकासाठी आणि मदतीसाठी या मजुरांनी आपल्या १३ व १४ वर्षीय मुलींनाही सोबत आणले होते.

**समितीचा हस्तक्षेप**

घटनेची माहिती मिळताच बीड जिल्हा बालकल्याण समितीने या प्रकरणात हस्तक्षेप करत पीडित मुलींना आधार दिला आहे. सध्या दोन्ही पीडित मुलींना बालकल्याण समितीने ताब्यात घेतले असून, त्यांची रवानगी सुरक्षिततेच्या दृष्टीने आधारगृहात करण्यात आली आहे. चार दिवसांनी फुटली वाचा: या घटनेनंतर दोन्ही मुली प्रचंड दहशतीखाली होत्या. अखेर ४ दिवसांनी, म्हणजे २८ डिसेंबर रोजी एका मुलीने हिंमत करून आपल्या वडिलांना आपबिती सांगितली. यानंतर मजुरांच्या पायाखालची वाळूच सरकली. वडिलांनी तात्काळ २९ डिसेंबर रोजी माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून सहाय्यक पोलिस निरीक्षक गोविंद पांडव यांनी वेगाने तपास करत दोन्ही आरोपींना अटक केली. पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी करत आहेत.

२४ डिसेंबर रोजी मजूर नेहमीप्रमाणे ऊसतोडणीसाठी शेतात गेले होते. यावेळी या दोन अल्पवयीन मुली झोपडीत एकट्याच होत्या. ही संधी साधत गावातील गणेश घाटूळ आणि त्याचा मित्र अशोक पवार या दोघांनी मुलींना झोपडीतून बाहेर काढून बाजूच्या उसाच्या व कापसाच्या शेतात नेले आणि तेथे त्यांच्यावर बळजबरीने अत्याचार केला.

# समाजसेवक फहीम शेख यांना 'सामाजिक कार्यकर्ते' पुरस्काराने सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील शाह अल्पसंख्याक बहु-उद्देशीय सेवाभावी संस्था आणि पोलीस हक्क संघर्ष संघटना (महाराष्ट्र राज्य) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी, ४ जानेवारी २०२६ रोजी एका भव्य सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात बीडमधील प्रसिद्ध समाजसेवक फहीम शेख यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल 'सामाजिक कार्यकर्ते पुरस्कार' देऊन गौरवण्यात आले.

**दिमाखदार सोहळा आणि मान्यवरांची उपस्थिती**

बीड शहरातील आंबेडकर भवन येथे हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्हा रुग्णालयाचे निवासी वैद्यकीय अधिकारी (ठचज) उपस्थित होते. त्यांच्याच शुभहस्ते फहीम शेख यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. फहीम शेख यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात दिलेले योगदान, जनसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी केलेली धडपड




आणि विविध सामाजिक उपक्रमांमधील त्यांचा सक्रिय सहभाग लक्षात घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. समाजातील गरजू घटकांसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे कौतुक झाल्यामुळे कामाला नवी ऊर्जा मिळते, अशा भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केल्या.

### संस्थांच्या कार्याचे कौतुक

शाह अल्पसंख्याक बहु-उद्देशीय सेवाभावी संस्था आणि पोलीस हक्क संघर्ष संघटना या दोन्ही संघटनांनी एकत्रित येऊन समाजातील विविध क्षेत्रांतील गुणवंतांचा गौरव करण्याचा जो उपक्रम राबवला, त्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. या कार्यक्रमाला शहरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निवडणूक डोळ्यासमोर ठेवून रस्त्यांची डागडुजी!

**बीड । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील खड्डेमय रस्त्यांमुळे दुचाकीस्वार घसरून पडून अपघात होत असताना, नागरिकांचे जीव जात असताना आणि पावसाळ्यात शालेय विद्यार्थ्यांना चिखलातून वाट काढावी लागत असताना ग्रामस्थांनी दिलेली निवेदने, लेखी तक्रारी व आंदोलने संबंधित भावी जिल्हा परिषद सदस्यांनी सातत्याने दुर्लक्षित केली होती. मात्र आता जिल्हा परिषद निवडणूक जवळ येताच अचानक रस्त्यांची तात्पुरती डागडुजी सुरू झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

काही ठिकाणी खड्ड्यांवर माती टाकणे, खडी पसरवणे, नाममात्र डांबरीकरण करणे तर काही ठिकाणी स्वखर्चाने रस्ता केला असे गाजावाजा करत फोटो-व्हिडीओ सोशल मीडिया व स्थानिक वृत्तपत्रांत झळकू लागले आहेत. मात्र हा खरा विकास नसून निवडणूक डोळ्यासमोर ठेवून केलेली दिखाऊ मलमपट्टी असल्याचा घणाघाती आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे.

निवडणूक नसती तर हे रस्ते तसेच खड्डेमय राहिले असते. अपघातात माणसं गेली, अनेकजण जखमी झाले, तरी कुणालाही जाग आली नाही. आता मतांसाठी अचानक प्रेम उफाळून आले आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ. ढवळे यांनी दिली. ही डागडुजी तात्पुरती असून पावसाळा आला की परिस्थिती पुन्हा जैसे थे होणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला. केवळ निवडणूकपुरते नव्हे तर दीर्घकालीन, दर्जेदार व टिकाऊ रस्ते बांधकाम व्हावे, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे.

**महाजनवाडी ग्रामस्थांनी निकृष्ट रस्ताकाम अडवले**

बीड तालुक्यातील बालाघाटावरील चौसाळा जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग मांजरसुंभा-पाटोदा-महाजनवाडी-बोरखेड या रस्त्याच्या डागडुजीचे काम सुरू असून सुमारे १० लाख रुपये खर्चाचे अंदाजे ८०० मीटर खडी-डांबरीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला.

विशेष म्हणजे रस्त्याच्या कामात डांबरच न वापरता केवळ खडी टाकून काम केले जात



असल्याचे निदर्शनास येताच संतप्त ग्रामस्थांनी रस्ताकाम तात्काळ बंद पाडले. यावेळी कंत्राटदाराने आपली चूक कबूल करत रस्त्यावरील खडी बाजूला काढून पुन्हा डांबर टाकून योग्य पद्धतीने काम करण्याचे आश्वासन दिल्यानंतरच ग्रामस्थांनी काम सुरू करण्यास परवानगी दिली. या वेळी सचिन घरत, गौतम घरत, कृष्णा घरत, संतोष शिंदे, पिंटू घरत, दादाहरी घरत आदी ग्रामस्थ उपस्थित होते. एकंदरीतच जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू झालेल्या या रस्ते दुरुस्तीमुळे विकासापेक्षा भावी लोकप्रतिनिधींचा संधीसाधूपणाच अधिक उघड होत असल्याची चर्चा सध्या गावोगावी रंगू लागली आहे.

# सार्वजनिक रस्ता अडविल्याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतली हातावर फाईल

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील भाटवडगाव ग्रामपंचायत अंतर्गत गट न.१३८ मधील सार्वजनिक रस्ता अडविल्याचे प्रकरणांची फाईल मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी फाईल हातावर घेतली. चौकशी चालू असताना ग्रामसेवक साहेबराव चव्हाण यांनी त्या जागी ची ना हारकत देवुन रमेश पवार यांना खरेदी खत केले असल्याचे तक्रारदार सुरेश साळवे, रमेश साळवे सह ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान यांची प्रत्येक्ष भेट घेऊन ते खरेदी खत रद्द करुन रस्ता पुर्ववत सुरू करून देण्यात यावे अशी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, दरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान यांनी या प्रकरणी स्वतः लक्ष घालण्याचे आश्वासन देवून फाईल हातावर घेतली आहे

तालुक्यातील भाटवडगाव ग्रामपंचायत अंतर्गत गट नंबर १३८ मधील चंद्रशेखर साखरे व उत्तम राठोड यांच्या मधुन पुर्व पश्चिम राठोड टॉकीज ते भाटवडगाव हा पुर्ववत सार्वजनिक रस्ता आहे असे मुळ मालक चोरमले यांनी सांगून प्लॉट विक्री केले आहेत परंतु या रस्त्यावर तत्कालीन



ग्रामसेवकाने व मालकाने पॉलट दाखवून रस्ताच विक्री केला व सध्या कार्यरत असलेले ग्रामसेवक साहेबराव चव्हाण यांनी आपल्या पुतण्या कमलेश चव्हाण यांच्या नावे घेवून तो सार्वजनिक रस्त्यावर पत्र्याचे शेड उभारून गेलीं सात ते आठ महिने पासून बंद केला आहे, या प्रकरणी तक्रारदार सुरेश साळवे, रमेश साळवे यांनी पस समोर उपोषण केले तर ३० ते ३५ ग्रामस्थांनी ग्रामपंचायत व गटविकास अधिकारी यांना निवेदन देवून रस्ता सुरु करू देणेची मागणी केली.

वेळी वेळी वरिष्ठांकडे तक्रर केल्याने या प्रकरणी चौकशी समिती गठीत करुन चौकशी करण्यात आली परंतु चौकशी चालू असतांनाच ग्रामसेवक साहेबराव चव्हाण यांनी या जागेची ना हारकत देवुन रमेश पवार यांना तो प्लॉट २ मे २०२५ रोजी विक्री करून नमुना नंबर आठ ला त्यांची नोंद ही घेतली आहे असा अधिकाराचा गैरवापर करणार्या ग्रामसेवक साहेबराव चव्हाण वर कायदेशीर कारवाई करून झालेले खरेदी खत रद्द करावे अशी मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान यांना पत्येक्ष भेटून निवेदना सह सर्व पुरावे सादर केले या निवेदनावर सुरेश साळवे, रमेश साळवे, बाबुराव जाधव, प्रशांत जगनाडे, प्रकाश राठोड, संजय राठोड, तानाजी सिरसट, आडे जी एम, सुरेश राऊत, राजेश राठोड यादीच्या सह्या आहेत. दरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान यांनी या प्रकरणी स्वतः लक्ष देण्याचे आश्वासन देवुन फाईल हातावर घेतली आहे.




# सबके सामने चुनौती, सबको बड़ी उम्मीद

महाराष्ट्र में निकाय चुनाव हो रहे हैं। बीएमसी में १९९७ से लगातार सत्ता पर काबिज उद्धव सेना के लिए यह चुनाव अग्निपरीक्षा से कम नहीं है। छगन भुजबल, नारायण राणे, संजय निरुपम जैसे नेताओं के पार्टी छोड़ने के बाद भी पार्टी को जो धक्का नहीं लगा था, वह अकेले एकनाथ शिंदे ने बगावत करके दे दिया। लगातार पांच चुनावों में सफलता के बाद इस बार उद्धव सेना से सत्ता लेने की कोशिश में लगी है, सालों तक युति में रही बीजेपी। केंद्र और राज्य में सरकार होने के बाद बीजेपी बीएमसी में ट्रिपल इंजन की सरकार चाह रही है। इसके अलावा, मैदान में अकेले उतरी कांग्रेस और समाजवादी पार्टी भी चुनौती देने की कोशिश में है। शिवसेना (उद्धव) के पास इस चुनाव में नतीजे देने के अलावा कोई ठोस पर्याय नही है। २०२२ में महाराष्ट्र में हुई बगावत के चलते सरकार और पार्टी गंवाने के बाद उद्धव ठाकरे के लिए यह सबसे बड़ी परीक्षा है। बीएमसी की स्थायी समिति पर लंबे समय तक पार्टी का कब्जा रहा। पार्टी में टूट के बाद कैडर में जोश भरने के लिए इस चुनाव में उद्धव खुद मैदान में मोर्चा संभाल रहे है। मनसे की स्थापना के बाद से पहली बार दोनों भाइयों (राज और उद्धव) ने युति करके मुकाबला करने का फैसला किया है। उद्धव ने पार्टी का आधार स्तंभ यानी शाखाओ का दौरा शुरू कर दिया है। बेटे आदित्य भी अपनी प्रगतिशील छविके जरिए युवाओं को लुभाने की कोशिश कर रहे है। पार्टी को मराठी मतदाताओं के अलावा मुस्लिमों वोटर्स पर काफी भरोसा है। लोकसभा चुनाव में विपक्षी एकता के तहत मिली जीत का स्वाद पार्टी विधानसभा में दोहरा नही सकी थी। इसीलिए, केवल वोटों के गणित की संख्या से मेयर बनाने की मुश्किल चुनौती सामने कायम है। देशभर में विस्तार के मंत्र पर चल रही बीजेपी ने बीएमसी चुनाव में पहली बार पार्टी का मेयर बनाने का संकल्प लिया है। पिछली बार महज दो सीटों से पिछड़ने वाली बीजेपीने चुनाव की तैयारियों में कोर-कसर नहीं छोड़ी है। शिवसेना (शिंदे) के साथ युति कर पार्टी ने विधानसभा चुनावों की सफलता को दोहराने का पूरा रोडमैप बनाया है। मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस और उप-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे की साझा मौजूदगी में चुनाव प्रचार अभियान शुरू कर पार्टी कार्यकर्ताओ को मिलकर ठाकरे बंधुओं के मुकाबले का संदेश दे रही है। मुंबई बीजेपी अध्यक्ष अमित साटम और पूर्व अध्यक्ष आशीष शेलार की जमीनी सक्रियता के अलावा सभी विधायकों को काम दिया गया है। पार्टी की तरफ से शिवसेना को दी गई ९० सीटें ही एक्स फैक्टर मानी जा रही है, इनके नतीजे सीधे मेयर की कुर्सी का गणित बनाएंगे। कांग्रेस अपनी जन्मस्थली पर ही जगह बनाने के लिए संघर्ष कर रही है। २०१४ में मुंबई से पार्टी के सफाए के बाद से ही यहां फिर से कांग्रेस वह मुकाम हासिल नहीं कर पाई है। किसी समय महानगर की ६ में से ५ लोकसभा सीटें पार्टी के पास थीं। इस बार पार्टी ने संगठन में जोश भरने के लिए अकेले चुनाव लड़ने का ऐलान किया था, लेकिन अंत में वचित बहुजन आघाडी को ६२ सीटें दे दी। हर बार की तरह उम्मीदवारों की लिस्ट भी देर से जारी की। कांग्रेस को मुस्लिम और दलित वोटो के अलावा अन्य वोटो पर भरोसा है। कांग्रेस ५० से ज्यादा सीटें जीतने का ख्वाब देख रही है, लेकिन मुस्लिम वोटों के लिए णइढ के अलावा सपा, एनसीपी (-झ) और -खचखच् जैसी पार्टियां भी मैदान में है। मुंबई में एनसीपी का वजूद पार्टी की १९९९ में स्थापना के बाद से ही कभी मजबूत नहीं रहा है। बगावत के बाद स्थिति और बदल गई है। शरद पवार फिलहाल ठाकरे बंधुओं के साथ गठबंधन कर ११ सीटों पर मैदान में है, जबकि अजित पवार अकेले ९४ सीटों पर उम्मीदवार उतार चुके है। इनमे बड़ी संख्या में मुस्लिम उम्मीदवार भी है। एनसीपी (-झ) के चुनाव की पूरी कमान मलिक परिवार पर है और पार्टी इस बार सीटों की संख्या बढ़ाकर सत्ता बनाने की स्थिति में आना चाह रही है। ठाकरे बंधुओं के साथ गठबंधन के चलते पार्टी को चुनावों में अच्छे मुकाबले की उम्मीद बंधी हुई है। मुंबई में उत्तर भारतीयों और मुस्लिमों के एक बड़े वर्ग की पसंदीदा रही समाजवादी पार्टी फिलहाल आतंरिक खीचतान में उलझी हुई है। पार्टी हर हाल में पिछला चुनावी प्रदर्शन दोहराना चाह रही है। पार्टी के २ विधायको में से एक रईस शेख लबे समय तक बीएमसी के मुद्दो पर पार्टी का प्रभावी चेहरा रहे है, लेकिन उनकी और प्रदेश अध्यक्ष विधायक अबू आसिम आजमी से अदावत अब जग-जाहिर हो चुकी है। इसका नुकसान भी पार्टी को उठाना पड़ सकता है। खीचतान के बीच सपा को स्थाई समिति में अपनी उपस्थिति दर्ज कराने के लिए ७-८ सीटें जीतनी ही होंगी।

# महासांगवीच्या केळीची आता 'इराण'ला भुरळ; ७० गुंठ्यातून थेट आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत झेप

**पाटोदा । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपल्या कष्टाच्या आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोरावर शेतीमध्ये क्रांती घडवून आणली आहे. महासांगवी येथील तरुण शेतकरी प्रमोद नवनाथ गर्जे यांच्या शेतातील केळीने आता थेट सातसमुद्रापार 'इराण'च्या बाजारपेठेत धडक मारली आहे. या यशामुळे स्थानिक केळी उत्पादकांसाठी जागतिक बाजारपेठेची दारे उघडली गेली असून परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

**असे केले नियोजनाचे 'मॉडेल'**

प्रमोद गर्जे यांनी आपल्या ७० गुंठे क्षेत्रात ठिबक सिंचनाचा वापर करून केळीची लागवड केली. ७ बाय ५ फूट या अंतरावर त्यांनी एकूण २००० रोपे लावली होती. एका रोपासाठी साधारण १५०



रुपयांपर्यंत खर्च आला असून, पिकाच्या वाढीसाठी खतांचे व सूक्ष्मद्रव्यांचे अचूक नियोजन त्यांनी सुरुवातीपासूनच केले होते.

**दर्जेदार उत्पादन आणि हमखास दर**

विशेष मशागत आणि नियोजनामुळे केळीच्या एका गडाचे वजन सरासरी २५ किलोपर्यंत भरले आहे. या दर्जेदार मालाची गुणवत्ता पाहून आंतरराष्ट्रीय व्यापाऱ्यांनी या केळीला १७ रुपये प्रति किलो इतका भाव दिला आहे. खतांमध्ये प्रामुख्याने १२:६१:००, १३:००:४५ यांसारखी विद्राव्य खते, सूक्ष्मद्रव्ये (बोरॉन, झिंक), कोंबडी खत आणि शेणखताचा समतोल वापर केल्यामुळे उत्पादनात मोठी वाढ झाली आहे.

**इराणला निर्यात आणि नव्या संधी**

या केळीची प्रत आंतरराष्ट्रीय दर्जाची असल्याने ती थेट इराण देशात निर्यात केली जात आहे. शेतीत केवळ पारंपरिक पिके घेऊन चालणार नाही, तर नवनवीन प्रयोग केले पाहिजेत. बाजाराची गरज ओळखून उत्पादन घेतल्यास जागतिक बाजारपेठ गाठणे कठीण नाही, असे मत प्रमोद गर्जे यांनी व्यक्त केले.महासांगवीसारख्या ग्रामीण भागातून केळीची निर्यात होणे, ही केवळ पाटोदा तालुक्यासाठीच नाही तर संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या प्रयोगामुळे इतर शेतकऱ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण असून, हा यशस्वी प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# विद्युत कर्मचारी स.पतसंस्था मर्या. पाटोदा येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी




**पाटोदा । प्रतिनिधी**

३ जानेवारी २०२६ विद्युत कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. पाटोदा यांच्या वतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या प्रसंगी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक, शैक्षणिक व क्रांतिकारी कार्याची माहिती देऊन करण्यात आली. स्त्री शिक्षणाचा पाया मजबूत करत समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा व अन्यायाविरुद्ध त्यांनी दिलेला लढा आजही प्रेरणादायी आहे, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास सुनील वाघमारे, सतीश गोरे, वैभव नाईकनवरे, खंडू बोबडे, चौरे, नाईकवाडे, शेख तसेच आझाद पत्रकार गणेश शेवाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी, सभासद व मोठ्या संख्येने उपस्थित होते. जयंती निमित्त सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचा, तसेच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा संकल्प यावेळी सर्वांनी व्यक्त केला. कार्यक्रम शेवटी उपस्थितांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याला सलाम करत सामाजिक समतेसाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार केला.

# जिल्हा रुग्णालय परिसराची तातडीने साफसफाई करा

## सामाजिक कार्यकर्ते राजू इनामदार यांची नगरपरिषदेकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील जिल्हा रुग्णालय हे सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यसेवेचे प्रमुख केंद्र आहे. मात्र सध्या रुग्णालय परिसरात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता पसरलेली असून कचऱ्याचे ढिगारे, दुर्गंधी, सांडपाण्याचा निचरा न होणे तसेच डासांची मोठ्या प्रमाणात पैदास होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. यामुळे रुग्ण, त्यांच्या नातेवाईकांसह रुग्णालयातील कर्मचारी यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर नगरपरिषद मार्फत जिल्हा रुग्णालय परिसराची तातडीने व नियमित साफसफाई करण्यात



यावी, अशी ठाम मागणी सामाजिक कार्यकर्ते राजू इनामदार यांनी केली आहे. इनामदार यांनी सांगितले की, दररोज शेकडो रुग्ण उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात येतात. मात्र अस्वच्छ वातावरणामुळे संसर्गजन्य आजार पसरण्याचा धोका वाढत असून नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ केला जात आहे.

रुग्णालय परिसरात नियमित स्वच्छता, कचऱ्याचे वेळेत संकलन, निर्जंतुकीकरण फवारणी तसेच सांडपाण्याचा योग्य निचरा करण्यात यावा. यासोबतच स्वच्छता कर्मचाऱ्यांची संख्या वाढवून त्यांच्या कामावर प्रभावी नियंत्रण ठेवावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे. ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने रुग्ण उपचारासाठी येतात. त्यांना स्वच्छ व सुरक्षित वातावरण मिळणे आवश्यक असून प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही सामाजिक कार्यकर्ते राजू इनामदार यांनी दिला आहे.

# बीड शहर विकास आघाडीच्या गटनेतेपदी खुर्शीद आलम

## निर्वाचित नगरसेवकांनी एकमुखाने केली निवड

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष यांच्या निर्वाचित सदस्यांकडून बीड शहर विकास आघाडीची स्थापना करण्यात आली असुन, गटनेते पदी खुर्शीद आलम यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. पक्षाशी एकनिष्ठ आणि विकासासाठी संघर्षशील असलेले कार्यकर्ते खुर्शीद आलम यांना यामाध्यमातुन न्याय मिळाला आहे.

बीड नगरपरिषद निवडणुक २०२५ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे हे दोन्ही पक्ष एकत्र मिळून लढले होते. त्यामध्ये या आघाडीकडून १३ उमेदवार निवडून आले आहेत. निवडून




आलेल्या उमेदवारांनी बीड शहर विकास आघाडी स्थापन करून गटनेते पदी खुर्शीद आलम यांची एकमुखाने निवड केली. या संदर्भात बुधवार (दि.३१) रोजी राष्ट्रवादी भवन येथे बैठक पार पडली. या बैठकीत आ.संदिप क्षीरसागर, माजी.आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष उल्हास गिराम यांची प्रमुख उपस्थिती होती. गटनेते पदी निवडून आल्या बद्दल खुर्शीद आलम यांचे तसेच सर्व निर्वाचित नगर परिषद सदस्यांचे आ.संदिप क्षीरसागर माजी.आ.सय्यद सलीम, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कळवा खरीगावात अमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या इसमाला अटक

## एकूण इंनोव्हा गाडीसह ६३८ किलो गांजासह २ कोटी पेक्षा जास्त उद्देमाल हस्तगत

**ठाणे । प्रतिनिधी**

मालमत्ता कक्ष, गुन्हे शाखा, नेमणुकीतील पोलीस हवालदार जयकर जाधव यांना मिळालेल्या माहिती आधारे खारेगाव टोल नाक्याकडून कळवा बाजूकडे जाणारे रोडवर, इन्होवा कार क्र. -झ-०९-इञ-९३८२ या वाहनातून ओडीसा व तेलंगना (आंध्रपंदेश) राज्यातून गांजा या अंमली पदार्थाची तस्करी करणारा इसम चिन्ना टागुर लक्ष्मण नायक वय ३६ वर्षे रा. राज्य तेलंगना आघ्रप्रदेश यास ताब्यात घेवून त्याचेकडून २,०४,१६,०००/- रू. किमतीचा एकुण ६३८ किलो वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ व १०,००,०००/- रु. किमतीची इन्होवा कार असा एकुण २,१४,१६,०००/- रु. किमतीचा मुददेमाल हस्तगत करून त्याचेविरूध्द कळवा पोलीस ठाणे ९५८/२०२५ एन.डी.पी.एस. अॅक्ट १९८५ चे कलम ८ (क), २०(ब), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयात एक आरोपी अटक




करण्यात आला आहे. आरोपी यास दि. ०३/०१/२०२६ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर दिला असून पुढील तपास मालमत्ता कक्षाकडून चालू आहे.

सदरची कारवाई ही मा. अपर पोलीस आयुक्त डॉ. श्री. पंजाबराव उगले (गुन्हे), मा. पोलीस उप आयुक्त श्री. अमरसिंह जाधव, गुन्हे, ठाणे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. विनय घोरपडे, गुन्हे शोध २. गुन्हे, ठाणे, यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता गुन्हे कक्षाचे वपोनिरी/गोरखनाथ घार्गे, पोउनि/संजय भिसे, मपोउनि/शितल पाटील, सपोउनि/शिवाजी गायकवाड, पोहवा/४४८७ दिनेश कुंभारे, पोहवा /६५६७ प्रशांत भुर्के, पोहवा/६४३६ संदीप भांगरे, पोहवा/२७८८ महेश साबळे, पोहवा / २९५८ जयकर जाधव, पोहवा /४८८८ राहुल शिरसाठ, पोना/५७९९ सचिन कोळी, पोना/६६२६ तौसीफ सैयद, पोअं/८३०१ महेश सावंत, चापोअं/१०२९ सदन मुळे, तसेच मपोहवा / ३१९२ आशा गोळे, मपोना/४०८५ गिताली पाटील यांनी केलेली आहे.



बीड जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके यांचे स्वागत करताना संभाजी सुर्वे, ए.एस.गोलु, भाळवणी ग्रामपंचायत सदस्य दिलीप डोंगर आदी.

# महाराष्ट्र राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक महेश गाडे यांना जिल्हा शिक्षक पुरस्कार प्रदान

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, ताडसोन्ना येथील माध्यमिक शिक्षक श्री. गाडे महेश चंद्रकांत यांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात विशेष उल्लेखनीय काम केल्याबद्दल सन २०२३ चा महाराष्ट्र शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यशिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त झाला होता. याच वर्षी त्यांना जिल्हा परिषद, शिक्षण विभाग, बीड चा जिल्हा शिक्षक गुणगौरव पुरस्कार २०२३ हा देखील त्याच वर्षी घोषित झालेला होता परंतु काही कारणास्तव हा पुरस्कार वितरण होऊ शकला नाही.



हा जिल्हा पुरस्कार यावर्षी नवीन वर्षी एक जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री मा. अजित (दादा) पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, बीडचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, आमदार संदीप क्षीरसागर, आमदार प्रकाश सोळंके, आमदार विजयसिंह पंडित, आमदार सुरेश धस, आमदार विक्रम काळे, बीडच्या नगराध्यक्षा प्रेमलता पारवे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जि प मुख्य कार्यकारी अधिकारी जीतीन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संजय जाधव, शिक्षणाधिकारी माध्यमिक प्रिया राणी पाटील, शिक्षणाधिकारी प्राथमिक डॉ. किरण कुंवर तसेच शिक्षण क्षेत्रातील व सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

# वडवणी पोलीस ठाण्यात पोलीस वर्धापन दिन साजरा

## ओळख आपल्या पोलीस ठाण्याची- स.पो.नि.वर्षा व्हगाडे

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहरातील पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली ओळख आपल्या पोलीस ठाण्याची हा उपक्रम शुक्रवार दि.०२ जानेवारी २०२६ रोजी वडवणी पोलीस ठाण्यात आयोजित करून महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

०२ जानेवारी १९६१ मध्ये महाराष्ट्र पोलीस दलाची स्थापना करण्यात आली म्हणून ०२ जानेवारी हा दिवस महाराष्ट्र राज्यत महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन म्हणून साजरा करण्यात येतो याच अनुषंगाने वडवणी पोलीस ठाण्याच्या कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी पोलीस ठाण्यात ओळख आपल्या पोलीस ठाण्याची हा उपक्रम राबवून त्या



अंतर्गत वडवणी येथील शाळेतील मुलींना वडवणी पोलीस ठाण्यात बोलून त्यांना गोपनीय शाखा, सीसीटीएचएस शाखा, मुद्देमाल कक्ष,ठाणे अंमलदार त्यांची कामे, महत्त्व पोलिसांचे रँक, शस्त्र त्यांचे महत्त्व त्यांचा उपयोग ही सर्व माहिती मुलींना सांगितली व ते सर्व साहित्य मुलींनी स्वतः हाताळले व त्यातून विद्यार्थी व पोलीस यांच्यामध्ये नवीन ओळख झाली. या उपक्रमाच्या माध्यमातून वडवणी पोलीस ठाण्यात पोलीस वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

हा उपक्रम राबवल्याबद्दल मुलींनी वडवणी पोलीस ठाण्याच्या पहिल्या महिला पोलीस अधिकारी स.पो.नि.वर्षा व्हगाडे मॅडम यांचे आभार मानून त्यांना व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# अंबाजोगाईत ऑनलाइन जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरातील सदर बाजार नाका परिसरातील एका इमारतीच्या तळमजल्यावर बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या 'फन टार्गेट' नावाच्या ऑनलाइन बिंगो जुगार अड्ड्यावर सहायक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या विशेष पथकाने शनिवारी (दि.०३ जानेवारी) सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास धडक कारवाई केली. या मोहिमेत पोलिसांनी दोन आरोपींना रंगेहात पकडले आहे. त्यांच्याकडून संगणक संच आणि रोख रकमेसह एकूण ५४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चार जणांविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सहायक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांना सदर बाजार नाका येथील आर. एन. बिल्डिंगच्या तळमजल्यात अवैध जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीची खात्री पटल्यानंतर शिंदे यांच्या आदेशानुसार पोलीस पथकाने सलमान चहाच्या हॉटेल शेजारी असलेल्या या ठिकाणी अचानक छापा टाकला. यावेळी परवेज शेख मोईज आणि मोहीद रशीद खान हे दोघे संगणकावर ऑनलाइन बिंगो जुगार खेळत आणि खेळवत असताना मिळून आले. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून ७,७३० आणि ५,९७० अशी एकूण १३,७०० रुपयांची रोख रक्कम जप्त केली. तसेच पीसी, मॉनिटर, की-बोर्ड आणि एलसीडी टीव्ही असे जुगाराचे साहित्य पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पकडण्यात आलेल्या आरोपींची चौकशी केली असता, हा जुगार अड्डा अंबाजोगाई येथील वाजेद सय्यद आणि आसिफ पठाण यांच्या मालकीचा असल्याचे निष्पन्न झाले. या कारवाईत सहायक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार सतीश कांगणे, पोलीस हवालदार घोळवे, शेख आणि पोलीस अंमलदार नागरगोजे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या प्रकरणी पोलीस अंमलदार सतीश श्रीराम कांगणे यांच्या फिर्यादीवरून परवेज शेख मोईज, मोहीद रशीद खान, वाजेद सय्यद आणि आसिफ पठाण यांच्या विरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १२ (अ) नुसार अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# सावित्रीमाई फुले जयंती निमित्त कार्यक्रमांचे आयोजन

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद माध्यमिक शाळा धारूर येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी ५३ व्या धारूर तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक गटात 'माती विना शेती' या प्रयोगाचा प्रथम क्रमांक आल्याबद्दल सहभागी मुलांचा सन्मान करून जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी शुभेच्छा दिल्या तसेच शाळेतील माध्यमिक शिक्षक उमाकांत अकुलवार यांना जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सन्मान करण्यात आला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद माध्यमिक शाळा धारूर येथे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, त्यामध्ये प्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून मुलांनी सावित्रीबाईंच्या जीवनपटाला भाषणाच्या माध्यमातून उजाळा दिला. त्यानंतर ५३ व्या धारूर तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात शाळेतील मुले शौर्य सचिन हरणावळ व जानवी अमोल शिंदे वर्ग ८वी यांच्या आधुनिक जगात अतिशय फायदेशीर असणारे 'माती विना शेती हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञान' या प्रयोगाचा प्राथमिक गटात तालुक्यात प्रथम क्रमांक आल्याबद्दल दोन्ही मुलांचा व विज्ञान प्रयोग मार्गदर्शक शिक्षक रमेश रुद्रे यांचा सन्मान करून जिल्हास्तरासाठी शुभेच्छा दिल्या, तसेच गणित तथा इतर विषयाच्या माध्यमातून सतत विद्यार्थ्यात रमणारे माध्यमिक शिक्षक उमाकांत अकुलवार यांना बीड जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल, त्यांच्याही शाळेच्या वतीने सन्मान करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक बालाजी खोत हे होते तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमेश रुद्रे यांनी केले. हनुमंत मंत्रे यांनी विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयीं सखोल मार्गदर्शन केले, कार्यक्रमाचे नियोजन व मुलींची वेशभूषा मनीषा कुलकर्णी व सुनंदा गायकवाड यांनी केली, तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यास सहकार्य शंकर इंगळे, दिनेश साखरे, भागवत सोनवणे व सुशील गाडे यांनी केले.

# प्रशासनाच्या संवेदनशीलतेने 'शिवरस्त्या'चा वाद मिटला

## मुर्शदपूर-तिप्पटवाडीतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला मुर्शदपूर आणि तिप्पटवाडी या दोन गावांमधील 'शिवरस्ता' अखेर खुला झाला आहे. महसूल प्रशासनाच्या सकारात्मक हस्तक्षेपामुळे आणि दोन्ही बाजूंच्या सामोपचाराने हा मार्ग मोकळा झाला असून, यामुळे शेतकऱ्यांच्या प्रगतीची आणि दळणवळणाची अडलेली वाट आता मोकळी झाली आहे. मुर्शदपूर-तिप्पटवाडी दरम्यानचा हा रस्ता केवळ मातीचा रस्ता नव्हता, तर तो शेतकऱ्यांच्या दैनंदिन जगण्याचा आधार होता. रस्ता बंद असल्याने पीक वाहतूक, जनावरांची ने-आण आणि पावसाळ्यात शेतात जाणे अत्यंत जिकिरीचे झाले होते. रस्ता बंद म्हणजे शेत बंद अशी परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकरी हवालदिल झाले होते. मात्र, प्रशासनाने जमिनीवर उतरून हा प्रश्न मार्गी लावला.



राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील (मूळ मजकुरात उल्लेख बावनकुळे असला तरी सध्या हे खाते विखे पाटील यांच्याकडे आहे) यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाने लोकसहभागातून प्रश्न सोडवण्याचे धोरण स्वीकारले आहे. छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांच्या सूचनेनुसार बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी या प्रकरणात लक्ष घातले. सुनील जगताप, अनिल जगताप, सोमेश्वर जगताप आणि बाबासाहेब जगताप यांनी रस्ता खुला करण्यासाठी अर्ज केला होता. दुसऱ्या बाजूचे शेतकरी विश्वंबर रोडे, चंद्रसेन रोडे, गोविंद रोडे व अन्य शेतकऱ्यांनीही आपली भूमिका मांडली. तहसीलदार शेळके यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून महसूल नोंदींचा अभ्यास केला. तिप्पटवाडीचे सरपंच विष्णू जायभाये आणि मुर्शदपूरचे माजी सरपंच जावळे यांच्या उपस्थितीत दोन्ही गटांशी संवाद साधण्यात आला. प्रशासनाने अत्यंत संवेदनशीलतेने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकल्यामुळे वादावर पडदा पडला.




### शेतकऱ्यांच्या भावना

**सुनील जगताप :** इतक्या शांततेत तोडगा निघेल असे वाटले नव्हते, आता शेतीकामाचे ओझे उतरले आहे. आमच्या म्हणण्याचा आदर ठेवला गेला. रस्ता खुला झाल्यामुळे गावात पुन्हा सलोखा निर्माण झाला आहे. रस्त्याची वाट मोकळी झाली म्हणजे आमचे आयुष्यच मोकळे झाले आहे. संवादाने मिटला वाद, मन जिंकले प्रशासनाने, रस्त्यासोबत गावही जोडले विश्वासाच्या बंधाने. अशी भावना यावेळी गावकऱ्यांनी व्यक्त केली. हा शिवरस्ता खुला झाल्यामुळे केवळ वाहतुकीचा प्रश्न सुटला नसून दोन गावांमधील नात्यात आलेला दुरावा देखील संपला आहे. स्थानिक प्रशासनाने दाखवलेली ही संवेदनशीलता जुने वाद मिटवण्यासाठी पथदर्शक ठरणार आहे.

# मांजरसुंबा घाटात पिकअपवर दगडफेक, लुटण्याचा प्रयत्न

**बीड । प्रतिनिधी**

धुळे-सोलापूर महामार्गावर वाटमारी करणार्या लुटारूंच्या मुसक्या बांधल्यानंतरही रात्री नेकनूर येथील संतोष काळे हे आपला पिकअप घेऊन जात असताना मांजरसुंबा घाटात अचानक त्यांच्या गाडीवर अंधाधूंद दगडफेक करण्यात आली. या दगडफेकीने गाडीचालक गाडी थांबवतो आणि नंतर लुटारू लूट करतात, परंतु काळे यांनी गाडी थांबवली नाही. त्यामुळे पुढील अनर्थ टळला, मात्र ११२ वर कॉल केला. तो कॉल उचलला गेला नाही. रात्री तशी मदत संबंधिताला मिळाली नसल्याचे सांगण्यात येते.



२०२५ च्या नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यामध्ये धुळेसोलापूर महामार्गावरील येरमाळा ते गेवराई दरम्यान वाटमारीच्या अनेक घटना घडल्या. त्यामुळे या रस्त्यावरून प्रवास करणार्यांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र मध्यंतरी बीड पोलिसांनी मोठ्या कारवाया करत लुटमार करणार्यांची धरपकड केली होती. त्यामुळे या महामार्गावरील वाटमारी आता थांबली, असे वाटत असतानाच रात्री पुन्हा मांजरसुंबा घाटात गाडीवर दगडफेक करून लूटमार करण्याचा प्रयत्न अज्ञात लुटारूंनी केला. नेकनूर येथील संतोष काळे हे आपला पिकअप घेऊन गावाकडे निघाले असता मांजरसुंबा घाटात अचानक त्यांच्या गाडीवर दगडफेक सुरू झाली. त्यांनी प्रसंगावधान ओळखून घटनास्थळी उभा न राहता पुढे जाणे पसंत केले. तेथून त्यांनी ११२ ला मदतीसाठी कॉल केला मात्र तो कॉल उचलला गेला नाही. सदरच्या घटनेने वाहन चालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. महामार्ग पोलिसांची या रस्त्यावर गस्त वाढवावी, अशी मागणी आता होत आहे.

# खुन केल्याच्या आरोपातून आरोपीची निर्दोष मुक्तता : ॲड. चंदनशिव

**बीड । प्रतिनिधी**

दुसरे जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब श्रीमती एस.आर. शिंदे मॅडम यांनी आरोपी नामे लहु लहानु अंकुशे व वजाबाई लहु अंकुशे यांची दिनांक ०२-०१-२०२६ रोजी निर्दोष मुक्तता केली. याबाबत थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी नामे प्रभु महेपती हातागळे यांनी दिनांक १८-०५-२०१८ रोजी पोलिस स्टेशन, पेठ बीड येथे फिर्याद दिली की, माझा पुतण्या नामे अमर. वय-१७ वर्षे व त्याचे सोबत १. संदिप कल्याण अंकुशे, २. विक्रम गंगाराम काळे हे इमामपुर जाणारे रोडवर चौकात उभे होते. तेवढ्यात राहुल लहु अंकुशे हा मोटार सायकलवर आला व रस्त्यावर का थांबले, रस्ता तुमच्या बापाचा आहे का असे म्हणला.

त्यावर अमर हा त्यास म्हणाला की, लहान मुलाला कशाला शिव्या देतोस असे म्हणाला. त्यावर राहुल अंकुशे गाडी लावुन परत आला व त्याने अमर याचे गचुरे धरुन खाली पाडले व नरडे दाबले व त्याचा आरडाओरडा ऐकुन राहुल याचे वडील लहु लहानु अंकुशे व त्याची आई वजाबाई लहु अंकुशे, त्याचा माम गोवर्धन शेटीबा काळे, अर्जुन दाजीबा काळे हे आले व त्यांनी छातीत, पोटावर लाथाबुक्याने मारहाण केली व मारहाण करत असतांना मी व माझे सोबत शिवाजी ज्ञानोबा अंकुशे असे आम्ही दोघे पळत गेलो. त्यावेळी वरील सर्व लोक अमर यास मारहाण करीत होते. मी त्यांना तुम्ही का मारता, त्यास मारु नका असे म्हणालो असता वरील सर्व लोक हे पळुन गेले. जखमी अमर यास मी व



माझे सोबत असलेले शिवाजी ज्ञानोबा अंकुशे यांनी टोरिक्षामध्ये टाकुन सरकारी दवाखाना, बीड येथे आणले व डॉक्टरांनी तपासुन अमर यास मयत घोषीत केले. त्यानंतर आरोपींचे विरुध्द पोलिस स्टेशन पेठ बीड येथे गुन्हा रजि.नं.१५७/२०१८ कलम ३०२, १४३, १४७, १४८, १४९ भा.दं.वि. प्रमाणे नोंद करण्यात आला. त्यानंतर सदर प्रकरणाचे दोषारोपपत्र मा. दुसरे जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब, बीड यांचे न्यायालयात दाखल झाले त्यास सेशन केस नं.१२०/२०१८ असा मिळाला. कॅक्टेरल फेब्रुवारी ६-२०१८ (८९८) सदर प्रकरणात सरकार पक्षकारातर्फे महत्वाचे साक्षीदार तपासण्यात आले. परंतु आरोपीं विरुध्द सबळ पुरावा सिध्द न झाल्याने व आरोपींचे वकीलांचा युक्तीवाद ऐकुन मा. दुसरे जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब, बीड यांनी सदर प्रकरणातुन आरोपींची निर्दोष मुक्तता केली. सदर प्रकरणात आरोपीतर्फे ॲड ए.एम. चंदनशिव यांनी काम पाहिले त्यांना ॲड. शाम हावळे, ॲड. रमेश उजगरे, ॲड. योगेश पवार, ॲड. प्राजक्ता डोंगरे यांनी सहकार्य केले.

# पत्रकारितेतील निर्भीड आवाजाचा सन्मान: 'बीड न्यूज आप तक'चे संपादक शेख इमरोज शरीफ यांना 'सावित्रीबाई फुले लोकरत्न पुरस्कार' प्रदान

## पोलिस हक्क संघर्ष संघटना व शाह अल्पसंख्याक संस्थेकडून गौरव; सामाजिक बांधिलकी जपल्याबद्दल सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

येथील शाह अल्पसंख्याक बहु-उद्देशीय सेवाभावी संस्था आणि पोलीस हक्क संघर्ष संघटना (महाराष्ट्र राज्य) यांच्या संयुक्त विद्यमाने बीड शहरातील आंबेडकर भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य सन्मान सोहळ्यात, डिजिटल मीडिया क्षेत्रातील विश्वसनीय नाव असलेल्या 'बीड न्यूज आप तक'चे मुख्य संपादक श्री. शेख इमरोज शरीफ यांना प्रतिष्ठित 'सावित्रीबाई फुले लोकरत्न पुरस्कार-२०२६' देऊन सन्मानित करण्यात आले.

पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ मानली जाते. बीड जिल्ह्यात डिजिटल पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे प्रश्न, गोरगरीब जनतेच्या समस्या आणि प्रशासकीय अनास्था यांना वाचा फोडण्याचे काम शेख इमरोज शरीफ यांनी अत्यंत प्रभावीपणे केले आहे. त्यांच्या याच निर्भीड आणि निष्पक्ष पत्रकारितेची दखल घेत, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या विशेष सोहळ्यात त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना श्री. शेख इमरोज शरीफ म्हणाले की, हा पुरस्कार म्हणजे माझ्यावरील जबाबदारीची जाणीव आहे. पत्रकारिता करताना केवळ बातम्या देणे हे उद्दिष्ट नसून, समाजातील शेवटच्या घटकाला न्याय मिळवून देणे हे माझे कर्तव्य आहे. हा सन्मान 'बीड न्यूज आप तक'च्या संपूर्ण टीमचा आणि आमच्या दर्शकांचा आहे.



सदर पुरस्कार सोहळा शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून डॉ. मुजाहिद मोमीन सर (अतिरिक्त शाल्यचिकित्सक, एडवोकेट झेबा मॅडम, डॉ. सुप्रिया विनेराव लोणे (प्रा. वेदप्रकाश पाटील आयुर्वेद कॉलेज, जालना), मा.श्री. कुलदीप वाकपंजार (जिल्हा आयुष्य अधिकारी जालना), डॉ. शेख शकिल जलाल (एक्स मेडिकल ऑफिसर .ए.एम.सी. औरंगाबाद), मा. शेख अब्दुल कदिर (शहा अल्पसंख्याक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था सचिव) उपस्थित होते. त्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन शेख इमरोज शरीफ यांचा सत्कार करण्यात आला.

या निवडीबद्दल राजकीय, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातून शेख इमरोज शरीफ यांचे कौतुक होत असून, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तसेच या कार्यक्रमाला डॉ. टी आर काझी, डॉ. पठाण इमरान, डॉ. सय्यद इमरान, डॉ. अबूल फैज खान, डॉ. सय्यद रईस, डॉ. हारिस, डॉ. रईसोद्दीन शेख, आदींनी यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

# कारेगव्हाण येथे यात्रा उत्सवानिमित्त कुस्त्यांचा कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील कारेगव्हाण येथे ग्रामदैवत बिरोबा देवाच्या यात्रा उत्सवानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून या यात्रा उत्सवाचा आणि कुस्त्याच्या कार्यक्रमाचा भाविक भक्तांनी व कुस्ती शोकिनानी लाभ घ्यावा, असे आवाहन कारेगावान ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येत आहे.

याबद्दल अधिक माहिती अशी की, बीड तालुक्यातील कारेगाव येथे ग्रामदैवत बिरोबा देवाच्या यात्रा उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून मंगळवारी दिनांक सहा रोजी संध्याकाळी संदलाची मिरवणूक निघणार आहे. बुधवार दिनांक सात रोजी ताज्या यात्रेनिमित्त ग्रामदैवत बिरोबा देवाच्या पालखीची भंडाराची उधळण करीत वाजत गाजत ढोल ताशाच्या गजरात मिरवणूक निघणार आहे. रात्री गोंधळी गीते आणि लोकनाट्य तमाशा मंडळाचामनोरंजनात्मक कार्यक्रम होणार आहे. गुरुवार दिनांक आठ रोजी या यात्रा उत्सवानिमित्त भव्य कुस्त्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कुस्ती विजेत्यास योग्य प्रकारचे बक्षीस देण्यात येणार आहे तरी या यात्रा उत्सवाचा भाविक भक्तांनी व कुस्ती शेवकिनांनी लाभ घ्यावा असे आवाहन कार्यगव्हाण ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येत आहे.



प्रभाग क्रमांक ४ चे नगरसेवक राकेश अण्णा जाधव यांची संपादक उत्तम मोहोळ यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली असता त्यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देताना रितेश उत्तम ओव्हाळ, प्रतीक्षा ओव्हाळ, अतुल जाधव व इतर.

# ईगलवुड इंग्लिश स्कूलची विज्ञान प्रदर्शनात उज्वल कामगिरी

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुकास्तरीय ५३ व्या विज्ञान प्रदर्शनात ईगलवुड इंग्लिश स्कूलने सलग चौथ्यांदा प्रथम क्रमांक पटकावून शैक्षणिक क्षेत्रात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. विशेष म्हणजे इयत्ता ९ ते १२ गटातून तालुक्यात प्रथम येण्याचा मान शाळेला मिळाला आहे. या प्रदर्शनात इयत्ता ९ वीचे विद्यार्थी स्वराज हरिभाऊ जाधव आणि पृथ्वीराज दिनकर शेजूळ यांनी सहभाग नोंदवला. त्यांनी सादर केलेल्या प्रयोगाचे नाव हरित ऊर्जेद्वारे कचरा व्यवस्थापन असे असून, पर्यावरणपूरक आणि भविष्यासाठी उपयुक्त अशा संकल्पनेमुळे परीक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

हे ५३वे विज्ञान प्रदर्शन फ्लाइंग बर्ड अकॅडमी या शाळेत भरवण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा डॉ.अर्चना पवार मॅडम, सचिव डॉ.शरद पवार सर, विश्वस्त डॉ.सुशील लोढा सर, शाळेचे प्राचार्य सत्यजित कांजाळकर सर, उपप्राचार्या प्रणिता कांजाळकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक कौतुक केले. या सातत्यपूर्ण यशाचे गमक म्हणजे डॉ.अर्चना पवार मॅडम यांचे शाळेवर असलेले वैयक्तिक लक्ष, नेहमीच दिली जाणारी प्रेरणा व मार्गदर्शन आणि त्यातून शिक्षकांन मध्ये आपल्या कामाप्रति तयार झालेली निष्ठा हेच आहे. या यशामागे अक्षय सर आणि कैलास सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनाची आवड आणि आत्मविश्वास निर्माण झाला असल्याचे व्यवस्थापनाने नमूद केले.




# पाडळसिंगी येथे शिवसेना शाखेचे उद्घाटन



**गेवराई । प्रतिनिधी**

पाडळसिंगी येथे शिवसेना शाखेचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात आणि जोशात पार पडला. या शाखेचे उद्घाटन जिल्हाप्रमुख चंद्रकांत आप्पा नवले यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव बापू मडके यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी ज्येष्ठ शिवसैनिक प्रकाशजी नरनाळे, मुकेश अण्णा महाजन, विक्रमराजे भोसले, युवा सेना शहरप्रमुख गणेश पवार, विधानसभा अध्यक्ष उमेश शिंदे, शिवसेनेचे नेते नागेश मिठे पाटील यांच्यासह असंख्य शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शाखेची जबाबदारी शाखाप्रमुख अभय भांडवलकर यांच्याकडे देण्यात आली असून शुभम नरोडे यांची शाखा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

प्रसंगी मार्गदर्शन करताना तालुकाप्रमुख उद्धव बापू मडके म्हणाले की, शिवसेना हा फक्त पक्ष नसून ती सामान्य माणसाच्या न्यायासाठी उभी असलेली चळवळ आहे. गाव तिथे शाखा आणि घर तिथे शिवसैनिक ही केवळ घोषणा नसून ती आमची कार्यपद्धती आहे. ते पुढे म्हणाले की, एकनाथजी शिंदे यांच्या लोकाभिमुख, विकासाभिमुख आणि सामान्यांच्या प्रश्नांसाठी लढणाऱ्या विचारधारेतून प्रेरणा घेत, गेवराई तालुक्यात प्रत्येक गावात शिवसेनेची शाखा उभारण्याचा संकल्प करण्यात आला आहे. शिवसेनेची विचारधारा तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवून त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम शिवसैनिक प्रामाणिकपणे करतील, असा ठाम निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या शाखा उद्घाटनामुळे पाडसिंगीसह संपूर्ण परिसरात शिवसेनेचे संघटन अधिक मजबूत होणार असून, येणाऱ्या काळात जनतेच्या प्रश्नांसाठी शिवसेना अधिक आक्रमकपणे रस्त्यावर उतरणार असल्याचा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये दिसून आला.

## गोपीनाथ मुंडे अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेचा लाभ ऑनलाईन

# महाडीबीटी पोर्टलद्वारे करता येणार अर्ज : जे.डी.शाह

**बीड । प्रतिनिधी**

लोकनेते गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेचा लाभ घेण्यासाठी आता महाडीबीटी पोर्टलमार्फत थेट ऑनलाईन मिळणार असून, शेतकऱ्यांना तात्काळ मदत विनाविलंब पोहोचवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे, तरी बीड जिल्ह्यातील सर्व सामान्य शेतकरी यांनी शेतात काम करीत असताना होणाऱ्या अपघातग्रस्ताची मदत मिळविण्यासाठी आपल्या गावातच महाडिबीटी या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावा असे आवाहन समाजसेवक जे.डी.शाह यांनी ऐका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

पत्रात पुढे म्हटले आहे की शेतात काम करताना होणाऱ्या अपघातांमुळे मृत्यू किंवा अपंगत्व आलेल्या शेतकऱ्यांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह ही योजना महत्त्वाची ठरत असून, यापूर्वी यासाठी ऑफलाइन स्वीकारल्या जाणाऱ्या अर्जाची प्रक्रिया आता पूर्णपणे डिजिटल करण्यात ओले आहे. तसेच शेतीत काम करताना विविध कारणांमुळे होणाऱ्या अपघातांमुळे अनेक शेतकऱ्यांचा मृत्यू किंवा अपंगत्वाच्या घटना राज्यात




वारंवार घडतात. अशा घटनांमध्ये शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळावी म्हणून राज्य सरकार १९ एप्रिल २०२३ पासून गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजना राबवत आहे. या योजनेत शेतकऱ्याचा अपघाती मृत्यू झाल्यास २ लाख रुपये तर एक डोळा किंवा एक अवयव कायमस्वरूपी निकामी झाल्यास १ लाख रुपयांची मदत दिली जात होती परंतु सरकारी काम अण् सहा महिने थांब कारण या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी किंवा वारसदारांना तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सविस्तर प्रस्ताव आणि आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागत होती.

पत्रात शेवटी म्हटले की लोकनेते गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदानेचा लाभ शेतकऱ्यांना तात्काळ मिळुन देण्यासाठी राज्य सरकारने पारदर्शी धोरण अवलंबिले आहे. यापुढे आपल्या राहत्या गावीच शासनाच्या महाडीबीटी या अधिकृत संकेतस्थळ अर्ज केल्यानंतर तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडून प्रस्तावांची तपासणी करण्यात येईल आणि तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखालील समिती मंजुरी देईल. त्यानंतर मंजूर अनुदानाची रक्कम बँक खात्यात जमा होणार आहे. लोकनेते गोपीनाथ मुंडे अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना करीता शेतकऱ्यांच्या वारसदारांच्या २०२५-२६ या वर्षाकरिता या योजनेसाठी १२० कोटी रुपयांची तरतूद देखील करण्यात आल्यामुळे आज अखेर ४३५९ शेतकरी प्रस्तावांना ८८.१९ कोटी रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत. महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन पद्धतीने योजना राबविल्यामुळे प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि शेतकरी केंद्रित होईल, अशी माहिती समाजसेवक जे.डी.शाह यांनी दिली आहे.

## पाडाळणे तालुका अकोले व अहिल्यानगर जिल्ह्यातील गरीब कुटुंबाला मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून एक लाख रुपयांचा दिलासा

# संकेत तुकाराम सानप यांच्या प्रयत्नांना यश तात्काळ १ लाख रूपये निधी उपलब्ध

## शासनाची मदत – जनतेच्या हाती संकेताचा तुकाराम सानप यांचा जनसेवेचा संदेश

**मुंबई । प्रतिनिधी**

सामाजिक बांधिलकी व लोकसेवा हाच आपला धर्म मानून काम करणाऱ्या मुंबई मंत्रालयातील आदर्श तिगावचे सुपुत्र संकेत तुकाराम सानप यांनी पुन्हा एकदा जनसेवेचा आदर्श उभा केला आहे. त्यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे पाडाळणे अकोले तालुक्यातील अहिल्यानगर जिल्ह्यातील अपघातग्रस्त रेखा लांडे या गरजू कुटुंबातील रुग्ण महिला भगिनी रेखा तानाजी लांडे अकोले यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून १ लाख रुपयांची रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली आहे.

रेखा लांडे ह्या हे गेल्या काही काळापासून अपघातग्रस्त असुन त्या आजाराशी झुंज देत असून, उपचारासाठी मोठा खर्च होत आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या या कुटुंबासाठी एवढा खर्च परवडणारा नव्हता. याची दखल घेत मंत्रालय प्रतिनिधी संकेत सानप यांनी वैद्यकीय कागदपत्रांसह शासन दरबारी पाठपुरावा करून मदतीची फाईल मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे पाठवली. अखेरीस त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली १ लाख रुपयांची मदत मंजूर करून रुग्णाच्या कुटुंबाच्या हाती पोहचवण्यात आली. दीपक जाधव



मेडिकल हॉस्पिटल संगमनेर अहिल्यानगर नवीन आठवले रोड बीएड कॉलेज जवळ श्रीराम नगर गुंजाळवाडी संगमनेर रेखा तानाजी लांडे या ठिकाणी ॲडमिट आहेत एक लाख रुपयांचा निधी वर्ग करण्यात आला आहे संकेत तुकाराम सानप यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले आहे या मदतीमुळे अकोले तालुक्यातील रेखा लांडे येथील कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे. रुग्णालयातील वाढते खर्च, औषधोपचार व इतर वैद्यकीय गरजा पूर्ण करण्यासाठी ही मदत उपयोगी ठरणार आहे. या निर्णयाबद्दल गावकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक जनतेकडून संकेत सानप यांचे अभिनंदन होत आहे. संकेत तुकाराम सानप यांनी यावेळी भावना व्यक्त करताना सांगितले की, गरीब, शेतकरी, मजूर, दिव्यांग आणि आजारपणाशी झगडणाऱ्या प्रत्येक गरजू कुटुंबासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी हा मोठा आधार आहे. शासनाच्या प्रत्येक योजना व मदतीचा लाभ खऱ्या अर्थाने जनतेपर्यंत पोहोचला पाहिजे, यासाठी मी सतत प्रयत्नशील आहे. रेखा लांडे व कुटुंबीय १ लाख रुपये मदत मिळवुन देत संकेत तुकाराम सानप यांनी आदर्श निर्माण केला आहे मदत मिळाल्याने माझ्या सेवाकार्यातील एक ध्येय साध्य झाल्यासारखे वाटते. असे यावेळी संकेत सानप यांनी सांगितले.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी प्रमुख रामेश्वर नाईक यांनीही या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, संकेत तुकाराम सानप यांच्यासारखे तरुण प्रतिनिधी जर अशा पद्धतीने जनतेच्या समस्यांचा पाठपुरावा करत राहिले, तर खऱ्या अर्थाने शासनाच्या योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचेल.

रेखा तानाजी लांडे कुटुंबीयांनी या मदतीबद्दल मुख्यमंत्री, निधी प्रमुख तसेच संकेत तुकाराम सानप यांचे आभार मानले असून गावातील नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले आहे. सामाजिक कार्य आणि जनसेवा हाच मार्ग निवडलेल्या संकेत सानप यांच्या या कार्यामुळे तरुण पिढीला प्रेरणा मिळत आहे. शासनाची मदत – जनतेच्या हाती हा उद्देश साध्य करताना आदर्श तिगावचे सुपुत्र संकेत तुकाराम सानप यांनी दिलेला हा दिलासा समाजातील वंचितांसाठी आशेचा किरण ठरला आहे.

# वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बेफिकिरीमुळेच बीड जिल्ह्यात भ्रष्टाचार वाढला!

## प्रशासन सुस्त झाल्याने संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी 'ॲक्शन मोड' वर येण्याची गरज

## माहिती अधिकाराला केराची टोपली; जन माहिती अधिकाऱ्यांच्या मनमानीमुळे भ्रष्टाचाराला फुटले धुमारे

## बीडमध्ये 'भ्रष्टाचाराचा' नंगानाच; विविध विभागांचा कारभार रसातळाला !

**बीड । विश्वनायक न्यूज**

**बीड जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये भ्रष्टाचाराने कळस गाठला असून, त्याचे मुळ कारण म्हणजे वृत्तपत्रांमधून दररोज प्रसिद्ध होणाऱ्या पुराव्यासह भ्रष्टाचाराच्या बातम्यांकडे जिल्हा प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या या 'सोयीस्कर' मौनामुळे कर्मचाऱ्यांचे धाडस वाढले असून, सामान्यांची लूट थांबवण्यासाठी आता संबंधित विभागाच्या मंत्र्यांनीच थेट हस्तक्षेप करून कार्यालयातील 'बड्या माशांना' तंबी देण्याची वेळ आली आहे. जिल्ह्यातील या प्रशासकीय अनागोंदीवर अंकुश लावण्यासाठी संबंधित विभागाच्या मंत्र्यांनी तातडीने बीडमध्ये आढावा बैठक घेऊन भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश देण्याची गरज आहे. जोपर्यंत एखादा बडा अधिकारी निलंबित होत नाही, तोपर्यंत ही साखळी तुटणार नाही.**

मागच्या काही महिन्यांमध्ये बीड जिल्ह्यामध्ये अनेक मोठमोठी भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आली आहेत. याशिवाय उघडकीस न आलेली अशी अनेक प्रकरणे असून दररोज अनेक कार्यालयात सातत्याने भ्रष्टाचार होत असल्याचे दिसत आहे. प्रत्येक कामासाठी पैसे मोजावे लागत असून, अशा कारभाराला जिल्ह्यातील जनता वैतागली आहे. एखाद्या विभागातील एखादा कर्मचारी किंवा कनिष्ठ अधिकारी भ्रष्टाचार करीत असेल, पैशाची मागणी करीत असेल तर लोक तक्रार करतात. ज्याने कोणी शासकीय कामांमध्ये भ्रष्टाचार केला त्याचीही दखल घेत वर्तमानपत्रे ही बातमी छापतात. मात्र संबंधित विभागाचे अधिकारी आणि जिल्ह्याचे वरिष्ठ अधिकारी याची नोंदच घेत नसल्याचा गंभीर प्रकार समोर येताना दिसतो आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची नोंद घेतली नाही त्याबाबत चौकशी केली नाही तर खालचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर वचक कसा राहणार ? आलेल्या बातमीची शहानिशा करून त्याबाबत चौकशी करणे गरजेचे आहे. मात्र असे होत नसल्याने, कालचे अधिकारी आणि कर्मचारी हे मोकाट सुटले आहेत. आपले काहीच होत नाही अशी त्यांची धारणा झाली आहे. याशिवाय अनेक कार्यालयामध्ये विविध प्रकारच्या माहिती मागविल्या जातात. माहितीच्या अधिकारातून केलेल्या मागणीला उत्तर देणे हे अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. मात्र सगळ्या विभागाचे प्रमुख सुरुवातीला माहिती देण्याचे टाळतात. त्यासाठी वेगवेगळी कारणे ते सांगत असतात. माहिती लपवणे म्हणजे भ्रष्टाचाराला खतपाणी घालणेच आहे. जर अपीलीय अधिकाऱ्यांचे आदेश कर्मचारी पाळत नसतील, तर त्या कार्यालयात कायद्याचे राज्य उरले आहे का? हा प्रश्न उपस्थित होत आहे.

तसेच भ्रष्टाचाराचा पर्दाफाश करण्यासाठी माहिती अधिकार हे सर्वात मोठे हत्यार आहे. परंतु, बीड जिल्ह्यात या कायद्याची अक्षरशः ऐशीतैशी करण्यात आली आहे. माहिती अधिकार कायदा अंतर्गत माहिती मागितली की ती नाकारणे किंवा उडवाउडवीची उत्तरे देणे यातच हे अधिकारी धन्यता मानतात. प्रथम अपील केल्यानंतर माहिती देण्याचे आदेश दिले जातात, पण खालचे कर्मचारी या आदेशांना 'केराची टोपली' दाखवतात. चकरा मारून थकलेला माहिती कार्यकर्ता शेवटी विषय सोडून देतो आणि याचाच फायदा घेऊन भ्रष्टाचार पचवला जातो आहे. जिल्ह्यातील हे चित्र अत्यंत भयावह असून, भ्रष्टाचाराला खतपाणी घालणारे आहे. यासाठी जिल्ह्याच्या पातळीवर असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आलेल्या तक्रारीवर लगेचच कार्यवाही करून त्याची चौकशी करण्याची गरज आहे.

### जिल्हाधिकारी ॲक्शन घेत नाहीत; आता मंत्र्यांनीच दखल घ्यावी...

वृत्तपत्रांतील बातम्यांची दखल घेऊन जर जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तंबी दिली असती, तर आज ही वेळ आली नसती. आता थेट मंत्र्यांनीच या भ्रष्ट साखळीचा बंदोबस्त करावा, अशी आग्रही मागणी बीड जिल्ह्यातील जनतेकडून होत आहे. जर तातडीने कठोर कारवाई झाली नाही, तर हा भ्रष्टाचार जिल्ह्याला पोखरून टाकेल. बीडमधील भ्रष्टाचार आता लपून राहिलेला नाही. वृत्तपत्रांतील बातम्या हाच सर्वात मोठा पुरावा आहे. तरीही कारवाई होत नसेल, तर याचा अर्थ खालून वरपर्यंत सर्वांचे हात ओले होत आहेत का ? असा संशय वाढवताना दिसतो. एखादी तक्रार आली किंवा एखाद्या विषयावर बातमी छापली गेली तर त्याची चौकशी झाली पाहिजे. चौकशी आणखी संबंधित आरोप केलेले अधिकारी कर्मचारी निर्दोष वाटले तर प्रश्न येत नाही मात्र दोशी असतील तर कारवाई झाली पाहिजे. यासाठी सुरुवातीला चौकशी करणे महत्त्वाचे आहे . मात्र तेच करण्याची जिल्हाधिकारी आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांची तयारी नसेल तर हा भ्रष्टाचार जिल्ह्याला पोखरून टाकेल. अशावेळी संबंधित खात्यांच्या मंत्र्यांनी क्शन मोडवर येण्याची गरज आहे आणि जे कोणी अधिकारी हलगर्जीपणा करत असतील त्यांनाही चपराक देण्याची आवश्यकता आहे.

### बातम्यांची दखल नाही, कारवाईचा धाक नाही!

जिल्ह्यातील विविध विभागांत होत असलेल्या आर्थिक गैरव्यवहारांवर स्थानिक वृत्तपत्रे सातत्याने प्रकाश टाकत आहेत. मात्र, या बातम्यांवर कोणतीही चौकशी न बसवता त्या दाबण्याचे प्रयत्न केले जात आहेत. वरिष्ठांकडून कसलीही विचारणा होत नसल्याने भ्रष्ट कर्मचाऱ्यांना मोकळे रान मिळाले आहे. जिल्हाधिकारी आणि विभाग प्रमुखांनी या बातम्यांची दखल घेऊन तातडीने चौकशी लावली असती, तर आज भ्रष्टाचाराचा हा भस्मासुर इतका वाढला नसता, असा खरा संताप नागरिक व्यक्त करत आहेत.

### माहिती अधिकार कायद्याचा 'खून'

भ्रष्टाचाराची माहिती बाहेर येऊ नये म्हणून विविध विभागांतील जन माहिती अधिकारी आणि अपीलीय अधिकाऱ्यांनी जणू 'मिलीभगत' केली आहे. माहिती दडवणे,माहिती मागितली तर ती 'उपलब्ध नाही' किंवा 'गोपनीय' असल्याचे सांगून नाकारली जाते. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी माहिती देण्याचे आदेश देऊनही संबंधित कर्मचारी – अधिकारी त्या आदेशाला केराची टोपली दाखवतात. कार्यालयाचे उंबरठे झिजवून माहिती कार्यकर्ता हतबल होतो आणि शेवटी पाठपुरावा सोडून देतो. हीच या भ्रष्ट अधिकाऱ्यांची खरी 'स्ट्रॅटेजी' बनली आहे. जी बीड जिल्ह्यासाठी अत्यंत धोकादायक ठरत आहे.

### पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यात तात्काळ चौकशी आणि कार्यवाही...

मराठवाड्यापेक्षा पश्चिम महाराष्ट्र हा सुधारलेला आहे हे जाहीर आहे. त्या ठिकाणचा प्रशासकीय कारभार हा पारदर्शक असतो याची अनेक उदाहरणे समोर आली आहेत. त्या विभागातील अनेक जिल्ह्यांमध्ये भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आली आहेत. त्याचे कारण म्हणजे एखाद्याने तक्रार केली किंवा वर्तमानपत्रात बातमी आली तर जिल्हाधिकारी आणि संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी तात्काळ याची दखल घेतात आणि चौकशीच्या कार्यवाहीचे आदेश देतात. त्या चौकशीतून जे निष्पन्न होते त्यानुसार तात्काळ कारवाई केली जाते. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून अशी दखल घेऊन चौकशी होत असेल तर कनिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी यांना चपराक बसते. असा प्रकार बीड जिल्ह्यात होताना दिसत नाही. जे लोक तक्रार करतात किंवा वर्तमानपत्रांमध्ये बातमी येते त्याची दखलच घेतली जात नाही. तक्रारदारालाच त्याचा फॉलोअप घ्यावा लागतो. एवढे सगळे करूनही शेवटी निष्पन्न काहीच होत नाही. वरिष्ठ अधिकारी आणि विभाग प्रमुख हे उदासीन असल्याने, पुढे काहीच कार्यवाही आणि कारवाई सुद्धा होत नाही. यामुळे भ्रष्ट असलेले कनिष्ठ अधिकारी, कर्मचारी यांना प्रोत्साहन मिळते आणि ते अधिकचा भ्रष्टाचार करू लागतात. याचमुळे जिल्ह्यातील भ्रष्टाचार थांबताना दिसत नाही.

## बीड कामगार कार्यालयात कंत्राटी कर्मचाऱ्याची 'दादागिरी'; जिल्हा इन्चार्जला नोकरीवरून काढण्याची थेट धमकी!

**बीड । प्रतिनिधी**

तालुका केज कामगार सुविधा केंद्राचे नियुक्ती आदेश असतानाही, बीड येथील जिल्हा कार्यालयात ठाण मांडून बसलेल्या एका मुजोर कंत्राटी कर्मचाऱ्याने सध्या प्रशासकीय वर्तुळात दहशत निर्माण केली आहे. नवीन जिल्हा इन्चार्ज आणि डेटा एन्ट्री ऑपरेटर यांना मानसिक त्रास देणे, धमकावणे आणि माझ्या वरपर्यंत ओळखी आहेत असे सांगून कार्यालयात हस्तक्षेप करण्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकारामुळे कामगार विभागाच्या प्रतिमेला तडा जात असून प्रामाणिक कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कंत्राटी कर्मचाऱ्याची बदली केज येथे झालेली असतानाही, तो नियमबाह्य पद्धतीने बीड कार्यालयात हस्तक्षेप करत आहे. मी याच भागातील रहिवासी असून हे ऑफिस माझ्याच भागात येते, त्यामुळे माझे कोणी काही करू शकत नाही, अशा शब्दांत हा कर्मचारी प्रशासनाला उघड आव्हान देत असल्याची चर्चा कामगार वर्गात सुरू आहे.खाजगी कंपनीच्या नावाचा गैरवापर; 'महेश देवकर' यांच्याशी जवळीक असल्याचा दावा स्वतःचा दबदबा निर्माण करण्यासाठी हा कर्मचारी एका खाजगी कंपनीचा आधार घेत आहे. कंपनीचे हेड महेश देवकर माझ्या खूप जवळचे आहेत, मी तुला एका दिवसात जॉबवरून काढून टाकीन, अशी थेट धमकी त्याने जिल्हा इन्चार्जला दिल्याने खळबळ उडाली आहे. शासकीय कार्यालयात खाजगी ओळखीचा वापर करून वरिष्ठ पदाधिकाऱ्यांवर दबाव टाकणे, हा अधिकाराचा स्पष्ट गैरवापर असल्याचे बोलले जात आहे.प्रशासकीय शिस्त धोक्यात; कर्मचाऱ्यांचा मानसिक छळ केवळ बदल्याच्या आदेशाचे उल्लंघनच नाही, तर नवीन कर्मचाऱ्यांना कामात अडथळा आणणे, त्यांना मानसिक त्रास देणे आणि दहशतीखाली ठेवणे असे गंभीर प्रकार सुरू आहेत. यामुळे कार्यालयातील कामकाजावर प्रतिकूल परिणाम होत असून, 'कंत्राटी' असूनही या कर्मचाऱ्याला कोणाचे पाठबळ आहे? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

**आंदोलनाचा इशारा: जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार मोर्चा..**

या धमकी आणि मानसिक छळाच्या प्रकरणाची प्रशासनाने तात्काळ दखल न घेतल्यास कामगार वर्ग आक्रमक पवित्र्यात आहे. संबंधित कर्मचाऱ्यावर कठोर कारवाई न झाल्यास, यापूर्वी जाहीर केलेल्या आंदोलनासह जिल्हाधिकारी कार्यालयावर तीव्र मोर्चा काढण्याचा इशारा देण्यात आला आहे.शासकीय नियमांची पायमल्ली करून कार्यालयात दहशत माजवणारे असे 'भस्मासूर' प्रशासनाने वेळीच वेचले नाहीत, तर सर्वसामान्यांचे प्रश्न सुटणे कठीण होईल.

**– त्रस्त कामगार प्रतिनिधी.**

## पालकांनी सावधगिरी, दुकानदारांनी जबाबदारी बाळगावी, शिक्षकांनी लक्ष द्यावे - एस.एम.युसूफ़

**बीड । प्रतिनिधी**



भाड्याने कपडे देणाऱ्यांकडून स्वच्छतेची ऐशी तैशी होत असल्याने विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे त्वचारोग होण्याचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे पालकांनी सावधगिरी, दुकानदारांनी जबाबदारी बाळगावी तर शिक्षकांनी लक्ष द्यावे असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे. याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, व्यवसाय मग तो कोणताही असो इमाने-इतबारे केल्यास ग्राहकांना चांगली सेवा मिळते. यामुळे ग्राहकालाही त्रास होत नाही आणि व्यावसायिकाचा व्यवसायही भरभराटीला येतो परंतु कपडे भाड्याने देणारे व्यावसायिक या धोरणाला हरताळ फासत असल्याचे दिसून येत आहे. शाळा/विद्यालयात घेतल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रमासाठी वेशभूषा करताना वेगवेगळ्या प्रकारचे कपडे घालण्यासाठी घ्यावे लागतात. पालकांना आपल्या पाल्यांसाठी फक्त एका कार्यक्रमाकरिता कपडे स्वतः खरेदी करणे परवडणारे नसते. म्हणून पालक वर्ग अशावेळी भाड्याने कपडे देणाऱ्या दुकानदारांकडे जाऊन कपडे घेत पाल्यांना कार्यक्रमासाठी तयार करतात. कपड्यांचे भाडे हे दिवसावर लावले जात असल्याने पालक वर्ग ज्या दिवशी कार्यक्रम असेल त्याच दिवशी भाड्याने कपडे घेण्यासाठी अशा दुकानांवर जातात. जेणेकरून एकाच दिवसाच्या भाड्यावर कपडे घेतले जावे हा त्या मागचा दृष्टिकोन असतो. पालकांचा हा दृष्टिकोन आर्थिक दृष्ट्या अगदी बरोबर आहे. मात्र भाड्याने कपडे देणारे व्यावसायिक कपड्यांची योग्य ती निगा राखत नसल्याने वापरून आलेले कपडे धुऊन, इस्तरी करून न ठेवता आले तसे ठेवून देत असल्याचे आणि पुन्हा तेच कपडे कुणाला हवे असल्यास जसे जमा करून घेतले होते तसेच नवीन ग्राहकाला देत असल्याचे निदर्शनास येत आहे. भाड्याने कपडे घेतल्यानंतर पालकांकडे एवढा वेळ नसतो की ते चांगले धुवून इस्तरी करून आपल्या पाल्यांना घालू शकतील.

कार्यक्रमादिवशीच कपडे घेतलेले असते म्हणून मळकट, अस्वच्छ, घाम फुटलेले कपडेसुद्धा पालक नाविलाजाने आपल्या पाल्यांना घालू लागले आहेत. असे कपडे घालणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे त्वचा रोग होण्याचा धोका नाकारता येत नाही. म्हणून पालकांनी सावधगिरी तर दुकानदारांनी जबाबदारी बाळगावी. शिवाय शिक्षकांनीही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कारण ते सुद्धा अशा दुकानदारांचे नाव व पत्ते विद्यार्थ्यांसह पालकांनाही देऊन त्यांच्याकडे पाठवितात. म्हणून या बाबीकडे शिक्षकांनीही लक्ष द्यावे असे मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी व्यक्त केले आहे.

## गेवराई नगराध्यक्ष गीता पवार यांच्या अपात्रतेसाठी याचिका दाखल!

### सरकारी जागेवर कब्जा, उच्च न्यायालयाच्या आदेशालाही केराची टोपली

**बीड । प्रतिनिधी**



गेवराई नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष सौ. गीता त्रिंबक पवार यांच्या विरोधात अपात्रतेसाठी जिल्हाधिकारी न्यायालय, बीड यांच्याकडे याचिका दाखल करण्यात आली आहे. सरकारी जागेवर गेल्या अनेक वर्षांपासून बेकायदेशीर अतिक्रमण करून त्याचा गैरवापर केल्याचा गंभीर आरोप या याचिकेत करण्यात आला आहे.

याचिकेनुसार, गेवराई शहरातील सर्वे नं. ५८, ५९ व ६१ या शासकीय मालकीच्या जागांवर सन २०१३ पासून लक्ष्मण पवार, सौ. गीता पवार व कै. माधवराव पवार यांच्या ताब्यात बेकायदेशीर अतिक्रमण आहे. या जागेवर अवैध बांधकाम करून त्यातून भाडे वसुली केली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, सन २०१३ पासून सौ. गीता पवार नगरसेविका आणि लक्ष्मण पवार आमदार असताना या सरकारी जागेवर अतिक्रमण झाले असून, लोकप्रतिनिधी पदाचा गैरवापर केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. या प्रकरणी जनहित याचिका क्र. १४६/२०१६ मध्ये मा. उच्च न्यायालयाने अतिक्रमण तात्काळ हटवण्याचे स्पष्ट आदेश दिले असतानाही आजपर्यंत ते आदेश अंमलात आणले गेलेले नाहीत, असा दावा याचिकेत करण्यात आला आहे.



दरम्यान, गेवराई शहर व तालुक्यातील नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासाठी १३,००० चौ. फूट जागेची मागणी केली होती. शासनाने या जागेसाठी नाहरकत प्रमाणपत्र दिले असतानाही पवार कुटुंबीयांनी स्मारक उभारणीस अडथळा निर्माण केल्याचा आरोपही याचिकेत नमूद आहे. या सर्व बाबींच्या आधारे, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीचे अध्यक्ष ॲड. संजय काशीनाथराव काळे यांनी महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत व औद्योगिक टाउनशिप अधिनियम, १९६५ मधील कलम ४४(२) अन्वये सौ. गीता त्रिंबक पवार यांच्या नगराध्यक्ष पदाच्या अपात्रतेसाठी याचिका दाखल केली आहे. सदर याचिका ॲड. चंद्रकांत ठोंबरे (उच्च न्यायालय, छत्रपती संभाजीनगर) यांच्यामार्फत दाखल करण्यात आली असून, या प्रकरणामुळे गेवराईच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

**नगराध्यक्ष अपात्रतेसाठी कायदा काय सांगतो?**

कलम ४४(२) – महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम, १९६५ कोणताही नगरसेवक किंवा नगराध्यक्ष जर शासकीय/नगरपरिषदेच्या मालकीच्या जागेवर अतिक्रमण करीत असेल, किंवा अशा अतिक्रमणात प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहभाग असेल, तर तो अपात्र ठरवता येतो. सौ. गीता पवार नगरसेविका असताना व कुटुंबातील सदस्य आमदार असताना सरकारी जागेवर अतिक्रमण झाल्याचा आरोप असल्याने, हा प्रकार सत्तेच्या दुरुपयोगाच्या कक्षेत येतो. यामुळे याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## खान बंधुची नगर पालिकेच्या डोळ्यात धुळफेक

## नविन पाण्याच्या टाकीची २६ गुंठे जागा हडप ! नवनिर्वाचित नगराध्यक्ष चाऊस समोर जागा ताब्यात घेण्याचे मोठे चॅलेंज

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव नगर पालिकेच्या आरक्षित/खुल्या जागा विक्री करत गब्बर झालेल्या मोठ्या खान बंधुनी नगर पालिकेच्या डोळ्यात धुळफेक करून स्वतःचे उखळ पांढरे केलेच पण त्या जागा घेणाऱ्या सर्व सामान्य नागरिकांनाही मोठ्या आडचणीत टाकले आहे. खानबंधूनी पालिकेची हाइप केलेली जागा परत घेण्याचे मोठे चॅलेंज नवनिर्वाचित नगराध्यक्ष चाऊस बांध्या समोर आहे. पाऊस हे चॅलेंज स्विकारुन पालिकेची मालमत्ता वाचवतात का? या कड़े कानाडोळा करतात? का पाऊस यांची ही या प्रकरणात मिलीभगत तर नाही ना? अशी शंका समान्य नागरिकांना निर्माण होऊ शकते. माजलगाव शहरात झालेल्या २७ गुंठे जागा कायदेशीर रित्या हडपण्याचा प्रयत्न १३ वर्षा पूर्वीच शासनाने हाणून पाडला होता.





भुअभिन्यासातुन पालिकेला जवळ पास १७ एकर जागा ओपनस्पेस म्हणून पालिकेकडे नोंद आहे. मात्र यातील जवळपास २० एकर जागा मुळ मालकांनी व इतरांनी अतिक्रमण करुन गिळंकृत केली असताना पालिकेवर राज्य करणायांनी याजगा पालिकेच्या ताब्यात येण्याचा कसलाच विचार केलेला नसल्याने आठवडी बाजाराच्या जागेचा प्रश्न केवळ निवडणुकीपुरता चर्चिला जातो. पुन्हा बाजार रस्त्यावर भरवुन बाजाराचा कर वसुल केला जातो. त्यातली त्यात शहरातील अत्यंत मोक्याचा आसलेल्या सर्वे नंबर ३८५ बाबत इतकी अनियमितता आहे की, या ठिकाणचे काही आरक्षण कसे रद्द झाले या बाबत साशंकता वाटत आसतांना पालिकेच्या मालकीच्या भूअभिन्यासाची बनावट पध्दतीने मोडतोड करुन त्यातील रस्ते व खुल्या जागा गिळंकृत केल्या आहेत. त्यातच येत आहे.

माजलगाव शहरासाठी पाणी पुरवठा करण्यासाठी पाण्याच्या टाकीसाठी सर्वे नंबर ३८५ मधील गढ़ी रोडवर असलेल्या आगेतील ४१ आर जागा ही संपादित करून पाण्याच्या टाकीसाठी ३२ क्रमांकाची नोंद डीपी प्लॅन मध्ये आहे. मात्र आजघडीला पालिकेकडे सदरील टाकीच्या खाली शिल्लक असलेली जवळपास केवळ १५गुंठे जगाच पालिकेच्या ताब्यात दिसुन ४१ आर. संपादीत पाण्याच्या टाकीची जागा आरक्षण क्र. ३१ ताब्यात केवळ १५ गुठेच आहे.

खान बंधुच्या मालकीचा आसलेल्या सर्व्हे. न.३८५ मध्ये आनेक ठिकाणी पालिकेच्या खुल्या (ओपन स्पेस) जागा हडप करून विक्री केल्या आहेत. विद्यमान नगरसेवक सहालभैया चाऊस यांच्या पत्नी फातेमा चाऊस अध्यक्ष असतांना नविन पाण्याच्या टाकीच्या आरक्षण क्र. ३१ मध्ये संपादित झालेल्या ४१ गुंठ्या पैकी २५९६ चौरस मिटर (२५.९६ गुंठे) जागा आरक्षणातून वगळण्याचा प्रस्ताव पालिकेने सन २००६ साली शासनाला पाठवला होता. परंतु शासनाने हा प्रस्ताव सन २००९ सालीच धुडकावलेला आहे. असे असतांनाही खान बंधुंनी मात्र सदरील पाण्याच्या टाकीसाठी सोडलेल्या ४१आर जागेची नोंद माजलगाव शहरातील ७/१२ उताऱ्यावर नसल्याचा गैरफायदा घेत बनावट कागदपत्रे तयार करून आरक्षित / खुल्या जागा सर्रासपणे विक्री केल्या त्याच पध्दतीने आरक्षण क. ३१ मधिल पाण्याच्या टाकीच्या परीसरातील जागा विक्री केल्या व काही जागेवर स्वतः अतिक्रमण केले पालिकेच्या मालकीची २६गुंठे जागा स्वतः च्या घशात घातली आहे.

माजलगाव नगर पालिकेच्या माजी नगराध्यक्ष फातेमा चाऊस यांनी त्यांच्या कार्यकाळात सुथारीत शहर विकास आराखडा माजलगाव या हेड खाली प्रधान सचिव, नगर विकास विभाग नवीमुंबई ३० मंत्रालय मुंबई यांना दि.९/५/२००० साली शहरातील जागा संपादना बाबत ४ ठिकाणच्या जागेचा प्रस्ताव पाठवला यात १ कन्या शाळा २) जुनी पाण्याची टाकी ३) बालक मंदीर ४) नविन पाण्याची टाकी मात्र राज्य शासनाने नविन पाण्याच्या टाकीच्या जागेचा प्रस्तावाची चौकशी करत व संचालक नगर रचना महाराष्ट्र राज्य पुणे याचा सल्ला घेतल्या नंतर सदरील प्रस्ताव अमान्य करत असल्याची महाराष्ट्र शासन राज-पत्रात दि.२७ ऑगस्ट २००९ साली नोंद महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने शिवाजी पाटणकर महाराष्ट्र शासनाचे अपर सचिव यांनी घेतली आहे.

**पालिकेने घेतले होते चार ठराव शहर सुधारित विकास आराखडा माजलगाव**

१) माजी नगराध्यक्ष नानाभाऊ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेतलेल्या मासिक सभेतील न.प. ठराव क्र.२३२ दि.१३/१२/ २०००(२) माजी नगराध्यक्षा सौ. मिरा प्रकाशराव आनंद गावकर यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभा दि. १८/०२/२००३ ला ठराव क. ८६ ने घेतलेला ठराव ३) माजी नगराध्यक्षा सौ. फातेमाबी सहाल चाऊस यांच्या अध्यक्षते खाली झालेल्या सर्वसाधारण सभेत घेतलेला ठराव क्र.१८.१ दि.७/४/२००६ ४) माजी नगराध्यक्षा सौ. फातेमाबी सहाल चाऊस यांच्या अध्यक्षतेखाली घेतलेल्या सर्वसाधारण सभा या प्रकरणी दि.१५ /१२/ २००६ रोजी २३० क्रमांकाचा घेतलेला ठराव. पाण्याच्या टाकीच्या जागेची नोंद ७/१२ उताऱ्यावर घेवुन मोजणी करुन घ्यावी गढी रोडवर असलेल्या नविन पाण्याची टाकीचे आरक्षण क ३१ साठी आसलेल्या ४१ आर जागेची नोंद अद्याप पर्यंत ७/१२वर नोंद घेतली नसल्याने मुळ मालक असलेल्या खान यांनी यांचा गैरफायदा घेत व सातबारा वरील क्षेत्र कमी न झाल्याचा गैरफायदा घेत याच सर्वे नंबर ३८५ मधिल लेआऊट मधिल ओपनस्पेस, रस्ते, व पाण्याच्या टाकीसाठी आरक्षित असलेल्या जागेची विक्री केली असल्याचे दिसुन येत आहे.

साप्ताहिक, विश्वनायक हे पत्र, प्रकाशक, मालक, संपादक, **शेख बिलाल शेख युसूफ** यांनी मुद्रक, जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै, ता, परळी वै, जि, बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे छापून **साप्ताहिक विश्वनायक** कार्यालय, खासबाग, खाजानगर, तुळजाभवानी मंदिर जवळ, ता,जि, बीड, महाराष्ट्र -४३११२२ येथे प्रकाशित केले, **(साप्ताहिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील)** मो. 8686888898 ई-मेल- vishvanayak94gmail.com

The weekly newspaper, Vishvanayak, is published by its publisher, owner, and editor, Sheikh Bilal Sheikh Yusuf. It is printed at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed, Maharashtra - 431122, and published from the Vishvanayak Weekly office, Khasbag, Khajanagar, near Tuljabhavani Temple, Taluka & District Beed, Maharashtra - 431122. (The editor may not necessarily agree with the content and news published in the weekly. The responsibility for selecting the content rests with them as per the PRB Act.) Mobile: 8686888898 - Email: vishvanayak94@gmail.com